# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि.
ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट :- ३७८/२०२३ दिनांक – २६/१०/२०२३

## मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस दलाकडून "फिट राईज ७५ फिटनेस प्रोग्रामचे" आयोजन

सरदार वल्लभभाई पटेल राष्टीय पोलीस अकादमी, हैद्राबाद स्थापनेस ७५ वर्षे पुर्ण होत असल्याने त्यानिमीत्ताने मा. श्री. अमित शहा, गृहमंत्री, भारत सरकार यांचे संकल्पनेतुन संपुर्ण भारतभर "फिट राईज ७५ फिटनेस प्रोग्राम" हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. सदर कार्यक्रमाची सुरवात दिनांक २७/१०/२०२३ रोजी पासुन सुरु होत असुन सुरुवातीस ५ किलोमीटर असे अंतर धावायचे आहे. असे एकुण पुढील ७५ दिवस हा कार्यक्रम संपुर्ण भारतभर चालणार आहे. त्याअनुषंगाने महाराष्ट्र राज्यात सर्व जिल्ह्यामध्ये या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. मिरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्तालयामध्ये देखील सदर फिट राईज ७५ हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस दलाचे वतीने श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. यादरम्यान ५ किमी दौडचे आयोजन करण्यात आले आहे. फिट राईज ७५ कार्यक्रमाअंतर्गत मिरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्तालयाचे पोलीस आयुक्त श्री. मधुकर पाण्डेय, अपर पोलीस आयुक्त श्री. श्रीकांत पाठक, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय) श्री. प्रकाश गायकवाड तसेच इतर वरीष्ठ अधिकारी यांचेसह मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस दलातील ५५० पेक्षा जास्त पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी नोंदणी करून सहभाग नोंदविला आहे.

याअंतर्गत ५ कि.मी. दौडचे आयोजन करण्यात आले असून सदर दौड ही दि.२७/१०/२०२३ रोजी सकाळी ०९.३० वाजता सुभाषचंद्र बोस मैदान येथून निघणार असून सदर दौडचा मार्ग हा सुभाषचंद्र बोस मैदान ते राधास्वामी सत्संग मार्गाने मिरारोड रेल्वे स्टेशनपर्यंत व परत वळन घेवुन राधास्वामी सत्संग मार्गाने सुभाषचंद्र बोस मैदान येथ पर्यंत असा असणार आहे.